# प्रेसनोट

## ''२८वा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह तथा महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान''

जा.क्र. २३/माहिती कक्ष/वार्तापत्र /२०१७,
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—०९/०१/२०१७.

**भंडारा** :— आज दिनांक ०९/०१/२०१७ रोजी येथील पोलीस मुख्यालयाच्या बहुद्देशीय सभागृह, भंडारा येथे जिल्हा वाहतुक पोलीस व राज्य परिवहन यांचे संयुक्त विद्यमाने २८ वा राष्ट्रीय रस्ता सुरक्षा सप्ताह तथा महाराष्ट्र राज्य रस्ता सुरक्षा अभियान २०१७ या कालावधी पर्यत सुरु राहणार आहे.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन व दिप प्रज्वलन मा. श्री. अभिजीत चौधरी जिल्हाधिकारी भंडारा यांचे हस्ते करण्यात आले व सदर कार्यक्रमामध्ये मा. श्री. अभिजीत चौधरी जिल्हाधिकारी यांनी आपल्या भाषणात सांगीतले की रस्त्याने वाहन चालवितांना वाहतुकीचे नियमाचे पालन करुन काळजीपुर्वक व सुरक्षीतपणे वाहन चालविण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच सदर अभियानाअंतर्गत शाळा व महाविदयालयात जावुन वाहतुकीचे नियम व सुरक्षासंबंधाने विदयार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येईल. रस्त्याने जातांना वाहन चालवितांना काळजीपुर्वक चालवुन वाहतुक नियमाचे पालन करावे. तसेच पावर पाईन्ट प्रेजेंन्टेशन द्वारे शाळेतील मुलांना वाहतुकीचे नियमाचे पालन न केल्याने काय नुकसान होते याबाबत माहीती उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा श्री. जोगदंड यांनी दिली.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन समारंभाचे प्रमुख अतिथी मा. श्री. शरद अहिरे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प.तथा सदस्य जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, भंडारा मा. श्रीमती रश्मी नांदेडकर अतिरीक्त पोलीस अधिक्षक, भंडारा धुर्वे साहेब मोटार वाहन निरीक्षक नारायण रा. निमजे सदस्य सचिव जिल्हा रस्ता सुरक्षा समिती तथा प्रभारी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, भंडारा गोकुळ द. राऊत पोलीस निरीक्षक वाहतुक नियंत्रण शाखा भंडारा उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. जोगदंड तसेच शाळकरी मुले उपस्थित होते. तसेच कार्यक्रमाचे सुत्र संचालन आरती देशपाडे यांनी केले. व आभार प्रदर्शन पोनी. राऊत वा. नी. शा भंडारा यांनी केले.

(बी.आर.गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.